श्रीमती सारडा महाविद्यालया तर्फे राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत दत्तक ग्राम वरूडा खुर्द येथे शालेय साहित्य, कोविड- १९ मुखाच्छादन, साबन व पशु आहार वितरण









नवराष्ट्र

# सारडा महाविद्यालयातर्फे शालेय साहित्य, पशु आहार वितरण

**अंजनगाव सुर्जी** (वा.). श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दत्तक ग्राम वरूडा खु. येथे 23 जूनला शालेय साहित्य, मास्क तसेच पशु आहाराचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाचे नियोजन महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. वशिष्ठ चौबे यांच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न करण्यात आला. या कार्यक्रमाचे उद्घाटन संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक, सन्माननीय डॉ. राजेश बुरंगे यांचे हस्ते करण्यात आले.

यावेळी डॉ. बुरंगे यांनी उद्घाटनीय भाषणात शालेय विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, मास्क, साबण व पशुमालकांना पशु आहार वितरण अशा नावीण्यपूर्ण उपक्रमाची मुहूर्तमेढ श्रीमती राधाबाई सारडा महाविलयाने रोवल्याचे सांगून महाविद्यालयाचे कौतुक केले. तर




अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. वशिष्ठ चौबे यांनी सामाजिक बांधिलकीची महाविद्यालयाला असलेल्या जाणिवेतून असे नवोपक्रम राबविण्यास नेहमीच तत्पर असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे संचालन प्रणाली निपाणे तर प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी केशव माकोडे यांनी केले. या कार्यक्रमाच्या आयोजनाकरीता गावकरी मंडळीचे सहकार्य लाभले. राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक प्रतीक निमकाळे, संकेत वालकडे, रोहित आठवले, मीत शिंदे, अमर कतोरे, सुमीत ताथोड, रजत भोग व विशाल वाघमारे स्वयंसेविका प्रणाली निपाणे व रक्षा वानखडे यांच्या अथक प्रयत्नातून तसेच कार्यक्रम अधिकारी केशव माकोडे, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. माला बारापात्रे, महाविद्यालयातील सहायक कार्यक्रम अधिकारी डॉ. नितीन घोडिले, डॉ. नितीन सराफ, चंद्रशेखर वढाळे, राजेंद्र मानकर, डॉ. विवेक पाटील, प्रा. रामचंद्र कुळकर्णी व गोपाल बागडी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# Distribution of school supplies, face masks, soap and animal feed from Smt. Radhabai Sarda College



**Anjangaon (Surji) - Mahesh Bunde 24 June:**

Mrs. Radhabai Sarda on behalf of the NationalServiceSchemeoftheCollegeofArts, CommerceandScienceattheadoptedvillage Varuda(Khu.)On23rdJune,schoolmaterials, face masks, soap and animal feed were distributed by the college. The planning of the program was done by the principal of the college. An attempt was made to maintain social commitment through the National Service Scheme conceived by Dr. Bashishta Choubey. The program started with the worshipoftheimageofShriSaraswatiandSant Gadge Baba, the lighting of the lamp and the performance of the song of Vighapitha. The program was inaugurated by Sant Gadge Baba of Amravati Vighapitha, Director of National Service Scheme, Hon'ble Dr. Rajesh Burunge. On this occasion, Principal Dr. Choubey, Sarpanch Shri. Ravibhau Bondre, Deputy Sarpanch Shri. Dharmaraj Bondre, Police Patil Shri. Sachinbhau Bondre, Secretary of Gram Panchayat Varuda Khu Shri. Director, Hon'ble Dr. Rajesh Burunge In his inaugural address, inaugurated the innovative initiative of distributing school materials, face masks, soap and animal feed to the school children through the National Service Scheme of Smt. Radhabai Sarda CollegeofArts,CommerceandScience.The President of this program, Dr. Choubey, Principal of the college, in his presidential address, said that the college is always ready to implement such innovations with the awareness of social commitment. On the occasion of distribution of school materials, it was appealed that other sections of the society should take inspiration and implement innovative activities. The program was conducted by Ku. Pranali Nipane. If the system is to be implemented, the introductory National ServiceSchemeProgramOfficerShri.Keshav MakodePerformedInthisprogram,thisproject was implemented following the rules of Covid-19.Theeventwasorganizedwiththehelpofthe villagers. Prateek Nimkale, a volunteer of Rashtriya Seva Yojana, to Sanket Wal. Rohit remembered. Ameet Shinde, Amar Katore, Sumit Tathod, Rajatbhog and Vishal Waghmare volunteers Ku. Pranali Nipane, Raksha Wankhade. The system was completed through the tireless efforts of Nipane and Raksha Wankhade. Also Women'sProgramOfficerDr.MalaBarapatre, college six. Program Officer Dr. Nitin Ghodile. Dr. Nitin Saraf, Mr. Chandrasekhar Wadhale, Shri. Rajendra Mankar, Dr. Vivek Patil, Shri. Ram Kulkarni and Shri. Bagdi had valuable support. On this occasion, Shri. Vilas Tayde, Mr. Santosh Sarode, Mr. Pushkar Sarda and Mr. Pralhad Lavate worked tirelessly.

आपल्या तालुक्यातील प्रत्येक बातमी

e-EDITION

दि.२५ जुन २०२१

जनसामान्यांचे हक्काचे व्यासपिठ

साप्ताहिक

वऱ्हाड दर्शन

संपादक - रवि एच. नवलकार

9527414139 / 9021677302

मुलगी वाचवा...
मुलगी शिकवा....

कार्यालय - मिराई प्रिंटर्स
सहकार नगर, बनोसा-दर्यापूर ४४४८०३

Gmail - ravi85nawalkar@gmail.com

# श्रीमती राधाबाई सारडा महाविघालयाकडुन शालेय साहीत्य, मुखाच्छादन, साबण व पशु आहार वितरण

बातमी संकलन – महेश बुंदे

श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य व विज्ञान महाविघालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दत्तक ग्राम वरूडा खु येथे दि. २३ जून रोजी शालेय साहीत्य्, मुखाच्छादन, साबण व पशु आहाराचे वितरण महाविघालयाच्या तर्फे करण्यात आले. कार्यक्रमाचे नियोजन महाविघालयाचे प्राचार्य डॉ. बशिष्ठा चौबे यांच्या संकल्पनेतुन राष्ट्रीय सेवा योजनेच्या द्वारे सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात श्री सरस्वती व संत गाडगे बाबाच्या प्रतिमेचे पुजण, दिपप्रज्व्लन व विघापिठाचे गीत सादरीकरण करुन करण्यात आले. या कार्यक्रमाचे उदघाटन संत गाडगे बाबा अमरावती विघापिठाचे, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक, सन्माननिय डॉ. राजेश बुरुंगे यांचे हस्ते करण्यात आले. या प्रसंगी व्यासपिठावर प्राचार्य डॉ. चौबे, सरपंच श्री.रविभाउु बोंदरे, उपसरपंच श्री. धर्मराज बोंदरे, पोलीस पाटील श्री. सचिनभाऊ बोंदरे, ग्रामपंचायत वरुडा खु चे सचिव श्री. पी. बी. मकेश्वर उपस्थित होते. संचालक, सन्माननिय डॉ. राजेश बुरुंगे यांनी उदघाटनपर भाषणात शालेय विदयार्थ्यांना शालेय साहीत्य्, मुखाच्छादन, साबण व पशुधारकांना पशु आहार वितरण अशा नाविण्यापुर्ण उपक्रमाची मुहूर्तमेढ श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य व विज्ञान महाविघालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या द्वारे रोवण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविघालयाचे प्राचार्य डॉ. चौबे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सामाजिक बांधिलकीची महाविघालयास असलेल्या जाणिवेतून असे नवोपक्रम राबविण्यास नेहमीच तत्प्र असते. शालेय साहित्य वितरणाच्या प्रसंगी समाजातील इतर घटकांनी प्रेरणा घेवून नाविण्यपूर्ण उपक्रम राबविण्यात यावा असे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन




कु. प्रणाली निपाणे तर प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी श्री. केशव माकोडे यांनी केले. या कार्यक्रमात कोव्हीड– १९ चे नियमाचे पालन करून हा उपक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमाच्या आयोजनाकरीता गावकरी मंडळीचे सहकार्य लाभले. राष्ट्रीय सेवा योजनेचे स्व्ंयसेवक प्रतिक निमकाळे, संकेत वालकडे. रोहित आठवले, मीत शिंदे, अमर कतोरे, सुमीत ताथोड, रजतभोग व विशाल वाघमारे स्वयंसेविका कु. प्रणाली निपाणे व रक्षा वानखडे यांच्या अथक प्रयत्नातून संपन्न झाला. तसेच महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. माला बारापात्रे, महाविघालयातील सहा. कार्यक्रम अधिकारी डॉ. नितीन घोडीले. डॉ. नितीन सराफ, श्री. चंद्रशेखर वढाळे, श्री. राजेन्द्र मानकर, डॉ. विवेक पाटील, श्री. राम कुळकर्णी व श्री. बागडी यांचे मोलाचे सहकार्य लाभले होते. या प्रसंगी श्री. विलास तायडे, श्री. संतोष सरोदे, श्री. पुष्कर सारडा व श्री. प्रल्हाद लवटे यांनी अथक परिश्रमातून कार्यक्रम संपन्न झाला.



SAKET
Pump, Moters Services
Jamnekar
8669125323
आमच्या येथे नविन पंप सुद्धा मिळतील.
रत्नाबाई राठी हायस्कूल समोर, बनोसा-दर्यापूर
Shubhamjamnekar36@gmail.com

आपल्या तालुक्यातील प्रत्येक बातमी

e-EDITION

दि. ०८ जुलै २०२१

कार्यालय - मिराई प्रिंटर्स
सहकार नगर, बनोसा-दर्यापूर ४४४८०३

जनसामान्यांचे हक्काचे व्यासपिठ

साप्ताहिक

वऱ्हाड दर्शन

Gmail - ravi85nawalkar@gmail.com

संपादक - रवि एच. नवलकार
9527414139 / 9021677302

मुलगी वाचवा...
मुलगी शिकवा....

# श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालयातर्फे रासेयो अंतर्गत पशु आरोग्य तपासणी शिबीर आयोजित

बातमी संकलन : महेश बुंदे

--------------------

महाविद्यालयीन युवकांचा शैक्षणिक विकास घडत असतांनाच युवकांमध्ये सामाजिक व सांस्कृतिक विकास घडविण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय सेवा योजना कार्य करीत असते. या उपक्रमा अंतर्गत विविध सामाजिक कार्यक्रम राबवून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्याचा प्रयत्न महाविद्यालय स्तरावर होत असतो. आजच्या घडीला संपूर्ण जग कोरोनासारख्या वैश्विक महामारीसोबत झुंजत असून माणसांसोबतच पशूंच्याही आरोग्यावर त्याचा विपरीत परिणाम जाणवत आहे. दरवर्षी ऋतु बदलामुळे पावसाळ्या प्रारंभी उद्भवणाऱ्या रोगांपासून पशूंचे रक्षण करण्याकरीता लसीकरण व तत्सम उपाय योजना करणे अत्यावश्यक असते. राष्ट्रीय सेवा योजनेचे ब्रीदवाक्य 'माझ्यासाठी नव्हे, तर तुमच्यासाठी' (नॉट मी, बट यु) व संत गाडगे बाबांच्या दशसूत्री संदेश लक्षात घेऊन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बशिष्ठ चौबे व डॉ. राजेश बुरंगे, संचालक, रासेयो, सं.गा.बा.अम. विद्यापीठ, अमरावती यांच्या मार्गदर्शनात श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंजनगाव सूर्जी तर्फे राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत दत्तक ग्राम वरुड खुर्द येथे शेतकऱ्याच्या पशुंकरिता पशु आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले. या प्रसंगी आयोजित कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बशिष्ठ चौबे, डॉ. शरद झोंबाडे (पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पं. स. अंजनगाव सुर्जी), डॉ. भालचंद बोरसे, श्री. रवि पाटील बोंद्रे (सरपंच, वरुड खुर्द) तसेच रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. केशव माकोडे यांची उपस्थिती लाभली.



प्राचार्य डॉ. चौबे यांनी आपल्या मार्गदर्शनात पशु आरोग्य तपासणी शिबीर आयोजनामागचा राष्टीय सेवा योजनेचा हेतू व महाविद्यालयाने कोरोना महामारी दरम्यान महाविद्यालयांमार्फत केल्या गेलेल्या सामाजिक कार्याचा आढावा सांगत दत्तक ग्राम वरुड खुर्द येथिल नागरिकांना सदर शिबिरामध्ये पशु चिकित्सा करून घेण्याचे आवाहन केले. कार्यक्रमादरम्यान श्री. रवि पाटील बोंद्रे (सरपंच, दत्तक ग्राम वरुड खुर्द) यांनी आपले मनोगत व्यक्त केले. पशु आरोग्य तपासणी शिबीरा दरम्यान डॉ. शरद झोंबाडे, डॉ. भालचंद बोरसे, डॉ. सागर बारब्दे, डॉ. अंकित जुनघरे, श्री. मदन तेलगोटे (पशुविमा), श्री. विनोद पोटे या चमूने सेवा दिली. शिबिरादरम्यान दत्तक ग्राम वरुड खुर्द येथील शेतकऱ्याच्या एकूण ५० पेक्षा जास्त पशुंची तपासणी करून लसीकरण करण्यात आले. शिबिरादरम्यान शेतकऱ्यांना पशूंकरिता मिनरल मिक्चर पावडर, कॅल्शियम इंजेकशने, गोचीड औषध, प्राण्यांच्या पचन संस्थेविषयीच्या रोगांवरील औषधे व इतर प्रकारची आवश्यक औषधे उपलब्ध करून देण्यात आली. कार्यक्रमादरम्यान कोविड-१९ विषयीच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्यात आले.

पशु आरोग्य तपासणी शिबीर आयोजनाकरिता प्रा. चंद्रशेखर वढाळे (गणित विभागप्रमुख), प्रा. राजेंद्र मानकर (भौतिकशात्र विभागप्रमुख), प्रा. डॉ. माला बारापात्रे (कार्यक्रम अधिकारी), डॉ. नितीन घोडीले (रासेयो, सहा. कार्यक्रम अधिकारी) तसेच दत्तक ग्राम वरुड खुर्द येथील श्री धर्मराज बोंद्रे (उप सरपंच, वरुड खुर्द), सौ. मीरा बोंद्रे, कु. गायत्री बोंद्रे, रासेयो स्वयंसेवक प्रतिक निमकाळे, रजत भोंग व अजिंक्य चिकटे यांचे सहकार्य लाभले.

मिराई फ्लेक्स प्रिंटींग & लग्न पत्रिका
बॅनर | लग्न पत्रिका | बिल बुक | पॉम्पलेट | कॅलेंडर | बॅकलाईट
बेस्ट क्वॉलीटी सर्व्हिस
सहकार नगर, अकोट रोड बनोसा, दर्यापूर
प्रोप्रा. स्वप्नील सुलताने मो. 9595964496